आई वडील हेच खरे भुतलावरील देव - वसंतजी हंकारे

>> पान 2

अडवाणी यांना असं बंदिस्त का ठेवल

>> पान 3

समाजाच्या शेवटच्या घटकासाठी कार्य हीच अर्थपूर्ण जीवनाची दिशा ! : न्या. अनिल किलोर

>> पान 4


**सुविचार**

मनापासून केलेली प्रार्थना नेहमी फलदायी होते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई




तेजश्री प्रधानने शेअर केला फिटनेस फंडा, जीम न लावता व्हाल स्लिम

आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 220 ■ सोमवार, दि. 24 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# संचारबंदी सहा दिवसांनी पूर्णपणे मागे

## नागपूर हिंसाचार : पोलिस बंदोबस्त मात्र कायम

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी : गेल्या सहा दिवसांपासून नागपूरमध्ये लागू असलेली संचारबंदी हटवण्यात आली आहे. गेल्या सोमवारी नागपूर शहरात झालेल्या हिंसाचारानंतर ११ पोलिस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली होती. ती आता उठवण्यात आली आहे. संचारबंदी उठवल्यानंतर नागपूर पोलिसांनी हिंसाग्रस्त भागात रुटमार्चही काढला. गणेशपेठ, कोतवाली , तहसील आणि यशोधरा नगर या भागात संचारबंदी उठवताच बाजापेठा उघडायला सुरवात झाली. छत्रपती संभाजीनगरमधील औरंगजेबच्या कबरीवरुन झालेल्या वादानंतर १७ मार्च रोजी नागपूरमध्ये दंगल उसळली होती.**

संचारबंदी उठल्यानंतर नागपूर पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी हिंसाचाराचे केंद्र राहिलेल्या भालदारपुरा या भागाची पाहणी केली. यावेळी एबीपी माझाशी बोलताना त्यांनी नागपूरची स्थिती नियंत्रणात असून परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संचार बंदी उठवण्याचा निर्णय घेतल्याचं सांगितलं. पुढील काळात सोशल मीडियाच्या वापरावर पोलिसांची कडक नजर राहणार असल्याचे देखील पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी सांगितलं.

नागपूरमधील अग्रेसन चौक, चिटणवीस पार्क , शिवाजी चौक ,गांधीगेट , महाल मार्केट हंसापुरी , मोमीनपुरा भागातून रुट मार्च काढण्यात आला. संचारबंदी हटवल्यानंतर या परिसरातील दुकानं उघडायलाही सुरुवात झाली आहे. हिंसाचारामुळे नागपुरात निर्माण झालेला तणाव आता निवळला असून जनजीवन पूर्ववत होवू लागल्याने नागपूरकरांकडूनही समाधान व्यक्त केलं जातंय.

गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबच्या कबरीवरून राज्यात वाद सुरू आहे. राज्यभरात हिंदुत्ववादी संघटनांकडून खुलताबादेतील (घर्हीश्रींरलरव) कबर हटवण्यासाठी आंदोलने सुरू आहेत. नागपुरात औरंगजेब कबरीवरून सुरू असलेल्या वादामुळे दंगल झाली.

१०४ दंगलखोरांची ओळख पटली

नागपूर दंगल प्रकरणात पोलिसांनी चार-पाच तासांत दंगल नियंत्रणात आणली. त्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करण्यात आला. या सगळ्यात अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले. यानंतर पोलिसांनी दंगलीचे सीसीटीव्ही फुटेज, लोकांना मोबाईलवर केलेले चित्रीकरण याआधारे दंगेखोरांची



ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई केली आहे. आतापर्यंत १०४ दंगलखोरांची ओळख पटली आहे. त्यापैकी ९२ जणांना अटक केली आहे. तर १२ जण अल्पवयीन असल्याने त्यांच्यावरही विधिसंघर्षित कायद्यानुसार कारवाई सुरु आहे.

हिंसाचार करणाऱ्या कुणालाही या प्रकरणातून सोडले जाणार नाही. पोलिसांवर हल्ला करणे हे अतिशय गंभीर बाब असून अशा हल्लेखोरांना जर सोडलं तर हे कायदा आणि सुव्यवस्था या दृष्टीने योग्य नाही. परिणामी त्यांना अद्दल घडवल्याशिवाय सोडणार नाही असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

## पक्षाच्या नेत्यांची केंद्रीय समिती नेमली - राज ठाकरे



**मुंबई/प्रतिनिधी :** पक्षाच्या नेत्यांची केंद्रीय समिती नेमली आहे. अशी प्रतिक्रिया मुंबईतील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर राज ठाकरे यांनी दिली आहे. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, अमित ठाकरेंवर मनसेच्या शाखा अध्यक्षांची जबाबदारी देण्यात आली आहे. संदीप देशपांडे मनसेचे मुंबईचे शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती केले आहेत. आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज ठाकरेंकडून नियुक्ती केली आहे. मुंबई पालिका निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पक्ष बांधणी सुरू आहे. पक्षाच्या नेत्यांची केंद्रीय समिती नेमली आहे. केंद्रीय समितीत बाळा नांदगावकर, अमित ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या मुंबई आणि ठाण्यासाठी रचना केलेली आहे.अशी माहिती माध्यमांशी बोलताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक संपन्न




**नांदेड/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार हे आज नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. नांदेडच्या नरसी येथे पक्षप्रवेश सोहळा पार पडल्यानंतर सायंकाळी नांदेड शहरातील स्वागत मंगल कार्यालयात नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर या चार जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये चार जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य नोंदणी अभियान आणि येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी दिल्या आहेत.



# पाणी फाऊंडेशनचं तुफान महाराष्ट्रभर पुन्हा येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत. पुढच्या वर्षीपासून आम्ही पूर्ण महाराष्ट्रात हे काम करूअशी घोषणा अभिनेता आमिर खाननं केली आहे. काही मोजक्या गावांमध्ये नाही तर आता राज्यभरातील अनेक गावांमध्ये पाणी फाऊंडेशनचं तुफान पुन्हा येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या उपक्रमाचा शुभारंभ पुण्यात करण्यात आला. ३ वर्षांपूर्वी एक स्वप्न घेऊन आम्ही पुढे आलो होतो. ते स्वप्न शेतकऱ्यांसाठी होतं. शेतकऱ्यांसाठी काय करू शकतो, पीक कसे वाढवता येईल हे सगळे मुद्दे घेऊन समोर आलो होता. देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो की ते आम च्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले म्हणून दरवर्षी आम्ही यशस्वी होत गेलो. असेही ते म्हणाले.

काय म्हणाले आमिर खान?

देवेंद्रजी प्रत्येक वर्षी तुम्ही मला एक गोष्ट विचारत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ

की हे काम घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात तुम्ही कधी जाणार आहात? पण आम्हाला थोडी भीती वाटते कारण ही जिम्मेदारी खूप मोठी आहे आपला महाराष्ट्र जर्मनी पेक्षा खूप मोठा आहे म्हणून भीती वाटते की राज्यभर आपण पाणी फाउंडेशनच काम घेऊन जाऊ शकतो का? आम्ही आता पाणी फाउंडेशनचे काम राज्यभर करणार आहोत.पुढच्या वर्षीपासून आम्ही पूर्ण महाराष्ट्रात हे काम करू.पाणी फाउंडेशनचे काम आता संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याचे अभिनेता आमिर खान म्हणाले. पाणी फाउंडेशन आता संपूर्ण राज्यभर काम करणार असल्याची घोषणा त्यांनी केली.पुढच्या वर्षीपासून राज्यभरतील अनेक गावांमध्ये पाणी फाउंडेशन काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या नव्या उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.शेतकऱ्यांसाठी काय करू शकतो, पीक कसे वाढवता येईल हे सगळे मुद्दे घेऊन समोर आलो होता. गट शेती करण्याचा प्रयत्न आम्ही केला. असेही अमिर खान म्हणाले.

आमीर खानने त्याच्या सत्यमेव जयते मार्फत दुष्काळाचं आव्हान पेलण्याचे ठरवले. काही वर्षांपूर्वी पाणी फाउंडेशनची स्थापना केली गेली. सत्यमेव जयतेच्या वैशिष्ट्याप्रमाणे दुष्काळी भागात फिरून उपलब्ध जलसाठे, पावसाचे प्रमाण इत्यादी आवश्यक माहिती गोळा केली गेली. त्यानंतर दुष्काळाला हरवण्याचा प्लान बनवण्यात आला. महाराष्ट्रातील विशेषत: म राठवाड्यातील काही गावांमध्ये पानी फाऊंडेशनचे काम झाले. आता महाराष्ट्रभर पाणी फाऊंडेशन काम करणार असल्याची घोषणा करण्यात आलीय.

# जिल्ह्यात शिक्षणाचा बट्ट्याबोळ !

### महिला शिक्षकांऐवजी मुलांना शिकवतात मजूर महिला

### बाल संगोपनच्या नावाखाली दोन शिक्षिका वर्षभरापासून दीर्घ रजेवर

### शिक्षण मंत्री आता काय कारवाई करणार याकडे लक्ष



**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**


**बुलढाणा :** बुलढाणा जिल्हयातील शिक्षण विभागाचा बट्ट्याबोळ झाल्याचे चित्र आहे .. चिखली तालुक्यातील शेलूद येथील जिल्हा परिषद शाळेवरील महिला शिक्षकांनी रोजंदारीवर महिलाना शाळेतील मुलांना शिकवण्यासाठी ठेवले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय.

या दोन शिक्षिका ह्या बाल संगोपनची रजा घेऊन स्वतःच्या मुलांना उच्चं शिक्षण मिळावे, यासाठी लातूरला गेल्याची माहिती आहे ... त्यामुळे बालसंगोपन् साठी मिळत असलेल्या रजेचा गैरफायदा होत असल्याचे ही समोर आलेय. मात्र यामुळे इकडे गोरगरीबांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून विद्यार्थी वाऱ्यावर आहेत ... अर्चना बाहेकर आणि शीला बाहेकर असे त्या महिला शिक्षकाचे नाव असून या दोघींनी रोजंदारीवर विद्यार्थ्यांना आपल्या जागी शिकवायला दोन महिलांना ठेवले आहे .. आणि या संपूर्ण प्रकारापासून शिक्षण विभाग हा अनभिज्ञ कसा, असा सवाल पालक वर्ग विचारत आहे .. तर शाळा व्यवस्थापन समितीने सुद्धा त्या दोन महिला शिक्षेकेविरोधात बऱ्याच वेळेस तक्रारी केल्या आहेत.

शिक्षणाधिकारी यांना सांगितले तर तुमच्याकडून काय होते ते करून घ्या , असे उत्तर पालकांना मिळते.. स्थानिक शिक्षण विभागाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले असून, आता या संपूर्ण प्रकाराकडे राज्याचे शिक्षण दादा भुसे यांनीच लक्ष घालून शिक्षण विभागांतील शिक्षकांसह अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी केलीय.

## एकनाथ शिंदे यांच्या खात्याला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू : उदय सामंत यांचा आरोप

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी स्मारक संदर्भात कुठेही गैरसमज नाहीत. जमीन मालकांनी स्मारकासाठी जागा देण्यास मंजुरी दिली आहे. येत्या महिन्याभरात छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचा आढावा तयार होईल. ९० दिवसांमध्ये आम्ही निविदा प्रक्रियेपर्यंत पोहोचू, एकनाथ शिंदे यांच्या खात्याला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. असा आरोप उद्योग मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.



यावेळी ते म्हणाले की, गेली अडीच वर्ष महायुतीच्या काळामध्ये मुंबईतील विकास काम झाली. ७५० किलोमीटरचे दोन टप्प्यात काँक्रिटीकरांचे रस्ते मुंबईमध्ये होत आहेत. उगाचच टीका टिपणी सुरू आहे आणि एकनाथ शिंदे यांच्या खात्याला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा काही लोकांचा उद्योग यातून काही निष्पन्न होणार नाही, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर आल्यात म्हणून आता हे प्रश्र्न उपस्थित केले जात आहेत.

उद्धव ठाकरे-नारायण राणे फोन प्रकरणात फोन करणारे उद्धव ठाकरे आहेत. काल नारायण राणे यांची पत्रकार परिषद आम्ही ऐकली. त्यामुळे या दोघांना तुम्ही विचारू शकता. फोन केला की नाही हे चांगले राणे साहेब सांगू शकतात. आणि काय बोलले हे चांगले उद्धव ठाकरे सांगू शकतात. दिशा सालियान प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. यात मला कॅबिनेट मंत्री म्हणून पडायचे नाही. योग्य तो निर्णय न्यायालय घेईल आणि त्याचे निर्देश पोलिसांना न्यायालय देईल.संजय राऊत यांना आपण देखील प्रश्र्न विचारला पाहिजे असं किती दिवस चालणार आहे. त्यांची पत्रकार परिषद झाल्यानंतर आमच्याकडून उत्तर मागू नका, त्यांच्या पत्रकार परिषदेनंतर आम्ही त्याला उत्तर देणे असे बंधन आमच्यावरती पत्रकारांनी घालू नये, असे मतही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# आई वडील हेच खरे भुतलावरील देव - वसंतजी हंकारे

दैनिक आपला विदर्भ

**शिरपूर जैन/प्रतिनिधी :** या भुतलावरील खरे देव जर कोण असतील, तर ते म्हणजे आई वडीलच आहेत. त्यांच्या उपकारांची परतफेड कधीच होऊ शकत नाही. त्यांच्या सेवेमध्येच खरी भक्ती आहे, असे मार्मिक विचार सामाजिक कार्यकर्ते वसंत हंकारे यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराज फाउंडेशन शिरपूर द्वारे आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना हंकारे यांनी पालकांच्या त्याग, प्रेम आणि कष्टांविषयी उपस्थितांना भावनिक आवाहन केले. आज समाजात आई-वडिलांकडे दुर्लक्ष होण्याची प्रवृत्ती दिसून येते. वृद्धापकाळात त्यांना सांभाळणे हे आपल्या संस्कृतीचे लक्षण आहे. त्यांची सेवा म्हणजेच खरी देवपूजा, असेही ते म्हणाले.




माझा बाप माझ्यासाठी काय करतो? याचा विचार प्रत्येक मुलीने अंतर्मुख होऊन केला पाहिजे. एकदा तरी बाप झोपल्यावर रात्री उठून त्याच्याकडे बघा. त्याच्या पॅन्ट व बनियनला चार जागेवर ठिगळं दिसतील, मात्र तोच बाप तुम्हाला फॅन्सी व नवनवीन कपडे घालून शाळेत व कॉलेजला पाठवतो. आता आम्हाला प्रबोधनाची गरज नाही. असा विचार न करता. तुमच्या आयुष्यात जो बदल घडणार आहे, त्याला परिवर्तन म्हणतात. ते परिवर्तन झालं पाहिजे, प्रत्येक व्यक्ती बदलला पाहिजे, प्रत्येक लेकराच्या काळजामध्ये परिवर्तनाची आग लागली पाहिजे. २१ व्या शतकामध्ये मोबाईलमुळे पूर्ण पिढी बिघडत चालली असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

शेवटी बोलताना हंकारे यांनी सांगितले की, शाळेत चार मार्क कमी पडले तरी चालतील पण वाघासारख्या बापाला आयुष्यात कधीही मान खाली घालायला लावू नका असे मत बोलताना व्यक्त केले. काळजाला भिडणारे शब्द व प्रखर विचार आपल्या परिवर्तनवादी शब्दातून हंकारे यांनी मांडले.

या कार्यक्रमास गावातील मान्यवर, युवक युवती व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. हंकारे यांच्या व्याख्यानाने श्रोत्यांना अंतर्मुख करत पालकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांना उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## इंक्रेडिबल प्रीमियम लीग

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची सुरुवात २२ मार्च पासून झाली असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला सतरा वर्ष पूर्ण झाली. या सतरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंगमुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली. जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा तीन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने २०२२ साली पदार्पणातच विजेतेपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे तर २०२३ साली देखील हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातच विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. आयपीएलमध्ये दहा संघ असले तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतेपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकाता संघाने तीनदा तर हैद्राबाद या संघाने दोनदा विजेतेपद मिळवले आहे. गुजरात या संघाने आपल्या पहिल्याच प्रयत्नात म्हणजे २०२२ ला विजेतेपद मिळविले तर राजस्थान रॉयल या संघाने आयपीएलच्या पहिल्या हंगामात म्हणजे २००८ साली विजेतेपद मिळविले. बंगळुरू, पंजाब, दिल्ली, लखनौ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतेपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्र्चर्य वाटायला नको. या वेळेची स्पर्धा एका नव्या कारणाने देखील चर्चेत आहे ती म्हणजे या वेळी अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहे. आयपीएलमध्ये सहभागी असलेल्या दहा पैकी ९ संघांनी कर्णधारपदी भारताच्या युवा खेळाडूची निवड केली आहे. फक्त हैद्राबाद या संघाने कर्णधार म्हणून ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सची निवड केली. उर्वरित नऊ संघाचे कर्णधार भारतीयच आहेत. ज्या धोनी आणि रोहित शर्माने आपल्या संघाला पाच विजेतेपद मिळवून दिले त्यांना यावेळी फक्त खेळाडू म्हणून मैदानात उतरावे लागेल कारण मुंबईच्या संघ व्यवस्थापनाने रोहित शर्माच्या जागेवर हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून निवड केली आहे तर धोनीने स्वतः कर्णधार पदाचा त्याग केल्याने युवा ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात चेन्नईच्या कर्णधारपदाची माळ पडली आहे. आरसिबी अर्थात बंगळुरू संघाने अनुभवी विराट कोहलीच्या जागी युवा रजत पाटीदारला संधी देत त्याच्याकडे बंगळुरू संघाचे नेतृत्व सोपवले आहे. गुजरात संघाच्या कर्णधार पदाची धुरा युवा शुभमन गीलच्या खांद्यावर आहे. मागील वर्षी कोलकाताचा कर्णधार असलेला आणि कोलकाताला तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देणारा युवा श्रेयस अय्यर यावेळी पंजाबचा कर्णधार बनला आहे तर मराठमोळा अजिंक्य रहाणे कोलकाताची धुरा सांभाळणार आहे. जीवघेण्या अपघातातून बचावलेला ऋषभ पंत लखनौचा कर्णधार आहे. संजू सॅमसन या युवा खेळाडूकडे राजस्थानची जबाबदारी आहे तर युवा अक्षर पटेल पहिल्यांदाच दिल्लीचे नेतृत्व करणार आहे.भारताच्या या युवा खेळाडूंवर कर्णधार पदाची जबाबदारी देऊन संघ मालकांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आहे. याच युवा खेळाडूंपैकी एखादा खेळाडू भविष्यात भारतीय संघाचे नेतृत्व करू शकतो म्हणजे भविष्यातील भारतीय संघाच्या कर्णधाराची पायाभरणी याच आयपीएल मधून होणार आहे. केवळ कर्णधारच नव्हे भविष्यातील संपूर्ण भारतीय संघच आयपीएल मधून निवडला जाईल. आज जे खेळाडू भारतीय संघात दिसतात ते सर्व खेळाडू आयपीएल मधूनच पुढे आले आहेत. भारतीय संघातील रविंद्र जडेजा, सूर्यकुमार यादव, शूभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, यजुवेंद्र चहल, वॉशिंगटन सुंदर, मोहंमद सिराज, मोहंमद शमी, संजू सॅमसन, ईशान किशन, ऋषभ पंत, वरुण चक्रवर्ती, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल असे सर्वच खेळाडू आयपीएलची देण आहे. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केल्यानेच या खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश मिळाला. आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे त्यामुळेच आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.

## तेजश्री प्रधानने शेअर केला फिटनेस फंडा, जीम न लावता व्हाल स्लिम

**मुंबई /प्रतिनिधी :** मराठी अभिनेत्री तेजश्री प्रधान आपल्या साधेपणातही प्रभावी जीवनशैलीसाठी ओळखली जाते. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने तिचा असा एक फिटनेस फंडा सांगितला की, ज्यासाठी ना जिमची गरज लागते ना डाएटिंगची! अगदी एक रुपयाही खर्च न करता तिने कसे स्वतःला फिट ठेवले आहे, याबाबत तिने स्वतः खुलासा केला आहे.

निसर्गाशी जुळवून घेण्याचा फंडा

मुलाखतीत तेजश्री प्रधानने सांगितले की, तिच्या फिटनेसच्या मागे कोणताही जिम किंवा महागडे तज्ज्ञ नाहीत. तिचा खरा आधार आहे निसर्ग. ती सांगते की मानसिक आरोग्य शारीरिक आरोग्याइतकंच महत्त्वाचं आहे, आणि त्यासाठी रोज सकाळी शांतवेळी स्वच्छ हवेत धावणं हा तिचा दिनक्रम आहे.

तिच्या मते, फिट राहण्यासाठी स्पोर्ट्स शूज, योगा मॅट किंवा महागडे ॲक्सेसरी आवश्यक नाहीत. मोबाइल बाजूला ठेवून निसर्गात धावण्याने मन शुद्ध होतं आणि शरीरही ताकदवान होतं, असं ती म्हणते. तिने फिटनेस म्हणजे स्वतःशी संवाद साधण्याची प्रक्रिया असं सांगून मानसिक शांतीला प्राधान्य दिलं.


## श्रीरामनवमी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे अंजनी खुर्द ते शेगाव पायदळ वारीचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे

**महारचिकना :** श्री संत गजानन महाराज सेवाभावी वारकरी शिक्षण संस्था अंजनी खुर्द तालुका लोणार तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंजनी खुर्द ते शेगाव पायदळ वारीचे नियोजन करण्यात आले आहे.

या दिंडीचे प्रयाण मिती चैत्र शु वार मंगळवार दि. १ एप्रिल २०२५ रोजी सकाळी अंजनी खुर्द येथून होणार असून दिंडीचा समारोप मिती चैत्र शु ९ वार रविवार दि. ६ एप्रिल २०२५ रोजी श्रीरामनवमीच्या शुभ मुहूर्तावर होणार आहे.



या पायी दिंडीसाठी दररोज संध्याकाळी मुक्कामीच्या ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार महाराजांतर्फे किर्तन सेवा देण्यात येणार असून अनेक भक्तांतर्फे ठीक ठिकाणी चहापाणी,फराळाचे व जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### दिंडीमध्ये भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने सामील होण्याचे संस्थांतर्फे आवाहन

या दिंडीमध्ये सामील होणाऱ्या भक्तांसाठी आयोजकांतर्फे नियमावली तयार करण्यात आली असून ती नियमावली पोम्प्लेट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.तरी ज्या भक्तांना या दिंडीचे नियम पाळून दिंडीमध्ये सामील व्हायचे आहे त्यांनी लवकरात लवकर आपली नाव नोंदणी करून देण्याचे आवाहन लोणार तालुका वारकरी महामंडळाच्या वतीने व दिंडी प्रमुख विश्वस्त मंडळ श्री संत गजानन महाराज सेवाभावी संस्थान अंजनी खुर्द च्या वतीने करण्यात आले आहे.

## ओव्हरहेड वायर तुटल्याने कोकण रेल्वे ५ तास विलंबाने

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** ओव्हरहेड वायर तुटल्याने कोकण रेल्वे ४ ते ५ तास विलंबाने धावत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. ओव्हर हेड वायर तुटल्याने विस्कळीत झालेली कोकण रेल्वेची वाहतूक सलग दुसऱ्या दिवशी देखील विलंबाने होत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी पसरली आहे. अनेक गाड्या चार ते पाच तास उशिरा धावत आहेत.

कोकण कन्या पाच तास उशिरा, तुतारी एक्सप्रेस एक तास उशिरा, वंदे भारत एक्सप्रेस अर्धा तास उशिरा, तेजस एक्सप्रेस अर्धा तास उशिरा, केरळा संपर्क क्रांति एक्सप्रेस अर्धा तास उशिरा धावत आहे. तर रत्नागिरीहून मुंबईला जाणारी रत्नागिरी दिवा गाडी एक तास उशिरा, मंगला एक्सप्रेस सव्वा तास उशिरा, नेत्रावती एक्सप्रेस सुद्धा सव्वा तास उशिराने धावत असून काल राजापूर जवळच्या आडवली इथे ओव्हरहेड वायर तुटल्याने कोकण रेल्वेची वाहतूक झाली होती विस्कळीत झाली आहे. तब्बल ११ गाड्या रेल्वे गाड्या विलंबाने धावत होत्या. आज देखील जवळपास नऊ गाड्या विलंबाने धावत आहेत. होळीसाठी आलेल्या चाकरमान्यांचे परतीच्या प्रवाशांमधून नाराजीचे सूर उमटत आहे.

## १० वर्षांपूर्वी चोरी गेलेले दागिने कोपरखैरणे पोलिसांनी मूळ मालकांना केले परत

दैनिक आपला विदर्भ





**नवी मुंबई /प्रतिनिधी :** आत्ताच्या महागाईच्या काळात दहा वर्षांपूर्वी हरवलेले सोने, चांदीचे दागिने परत मिळाल्यावर मूळ मालकाचा आनंद गगनात मावेनासा झाला. कोपरखैरणे पोलिसांनी आपल्या हद्दीतून हरवलेले तसेच चोरीला गेलेले तब्बल ३० लाखांचे दागिने शोधून मूळ मालकांना परत केले आहेत. कोपरखैरणे परिसरातील गेल्या दहा वर्षापासून हरवलेले तसेच चोरीला गेलेल्या ९ तक्रारदारांना त्यांचे दागिने पोलिसांनी परत केले आहेत. इतक्या वर्षांनंतर आपले दागिने परत मिळाले यावर विश्वास बसत नाही. पोलिसांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत, असे मूळ मालकाने आनंद व्यक्त करताना सांगितले. कोपरखैरणे पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## नांदेड येथे आयोजित इफ्तार पार्टीला उपमुख्यमंत्री अजित पवारांची उपस्थिती

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरातील देगलूर नाका भागात पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुस्लिम बांधवांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात केलं होतं. या इफ्तार पार्टीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित लावली. त्यांच्यासोबत मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री नवाब मलिक, संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर आदींची उपस्थिती होती.



## आमदार संजय गायकवाड यांच्या नेतृत्वात ठाकरे गटाच्या व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या जन्मस्थळी थड येथे काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष नीता पाटील यांच्यासह विविध गावातील सरपंच, माजी सरपंच, ग्राम सोसायटी सदस्य, विविध सेलचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि ग्रामपंचायत सदस्य यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. तर उबाठा गटाचे किसान सेना तालुकाप्रमुख सुधाकर सुरडकर, बुलढाणा नगरपालिकेच्या माजी नगरसेविका प्रमिला लक्ष्मण गवई यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रक्ष प्रवेश केला आहे. यावेळी त्या ठिकाणी प्रामुख्याने शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, महाराष्ट्र राज्य युवासेना कार्यकारणी सदस्य युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, माजी नगराध्यक्ष विठ्ठलराव येवले, भैय्या जयस्वाल यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### आम्हालाच न्याय मिळत नाही तर सर्वसामान्यांना काय न्याय मिळेल एकनाथ खडसे यांचा आरोप



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था ढासळली आहे. या राज्यात सरपंच हे आता सुरक्षित राहिलेले नाहीत, सरपंचाची हत्या या राज्यात व्हायला लागल्या आहेत. लोकप्रतिनिधी देखील सध्या सुरक्षित नाहीत. राज्यात महिला सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला. काल जळगावातील उपसरपंचाची हत्या झाली. धरणगावात एका मुलीची छेड करण्यात आली आहे. आम्हालाच न्याय मिळत नाही तर, सर्वसामान्यांना काय न्याय मिळणार असा आरोप आमदार एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना केला. तसेच रक्षा खडसे मुलगी प्रकरणाला तीन आठवडे झाले तरी, आरोपी पोलिसांना मिळत नाहीत.हा मोठा प्रश्न आहे.येथे आम्हालाच न्याय मिळत नसल्याने सर्वसामान्यांना काय न्याय मिळेल, असा प्रश्न यावेळी आमदार एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

### कांद्यावरती निर्यात बंदी आणि निर्यात शुल्क लावू नये एवढीच अपेक्षा सदाभाऊ खोत यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** येथून पुढे सरकारने कांद्यांवरती निर्यात बंदी आणि निर्यात शुल्क लावू नये, अशी अपेक्षा आमदार सदाभाऊ खोत यांनी माध्यमांशी बोलना व्यक्त केली. महाराष्ट्रात नगदी पीक म्हणून कांद्याकडे पाहिलं जातं आणि विशेषतः उत्तर महाराष्ट्र, खानदेश असेल, मराठवाड्याचा काही भाग असेल मोठ्या प्रमाणात कांदा लागवड होत असते. कांदा हे पीक गेल्या अनेक वर्ष झाले संवेदनशील पीक झालेलं आहे, राजकीय मुद्दा सुद्धा बनत चालला आहे. वारंवार कांदा उत्पादकांवर या देशात अन्याय होत आलेला आहे. केंद्र सरकारने नुकतेच कांद्यावरील निर्यात बंदी उठवली आहे. या निर्णयाचे मी स्वागत करतो. परंतु, कोणत्याही शेतमालावरती शेतकऱ्याच्या पिकावरती निर्यात बंदी निर्यात शुल्क खऱ्या अर्थाने लावलं गेलं नाही पाहिजे, शेती सुद्धा एक उद्योग आहे. उद्योग म्हणून त्याकडे पाहिलं पाहिजे, ज्यांना कांदा खायला महाग वाटतो अशांनी निश्चितपणे शेतकऱ्यांच्या बांधावर यावं, कांदा लावावा, त्यावर खुशाल रात्रभर झोपावं. परंतु, शेतकऱ्यांची माती करू नये. ही भूमिका आम्ही नेहमीच घेत आलेलो आहोत. सरकारने इथून पुढे तरी कांद्यावरती निर्यात बंदी आणि निर्यात शुल्क लावू नये,अशी अपेक्षा आमदार सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली.

### अनधिकृत भोंगे काढले नाही तर भाजप रस्त्यावर उतरेल, किरीट सोमय्या यांचा इशारा




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भांडुप मधील मशिदींवरील अनधिकृत भोंग्या प्रकरणी आज भाजप नेते किरीट सोमय्या यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह भांडुप पोलीस ठाणे येथे जाऊन पोलिसांची भेट घेतली. यावेळी भांडुप मध्ये मशिदींवरील भोंगे पोलिसांनी दिलेल्या परवानगी बद्दल किरीट सोमय्या यांनी काही प्रश्न उपस्थित केले. सदर मशिदींवर असलेल्या भोंगे यांना परवानगी देताना या मशिदीची कागदपत्रे तपासणी केली नाहीत. ज्यामुळे या मशिदींवरील भोंग्याना परवानगी देऊ नये, ४८ तासात जर हे भोंगे काढले नाही तर भाजप रस्त्यावर उतरेल असा इशारा किरीट सोमय्या यांनी पोलिसांना दिला आहे.

# अडवाणी यांना असं बंदिस्त का ठेवलं


## खासदार संजय राऊत यांची पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : आता लाल कृष्ण आडवाणी यांची अवस्था शहाजान सारखी झाली आहे. ना ते सुद्धा लाल कृष्ण आडवाणी हे या देशातल्या सध्याचे हिंदुत्ववाद तुम्हाला दिसत आहे. राम मंदिर दिसत आहे. त्याचे शिल्पकार आहेत त्यांनी हे सर्व शिल्प उभं केलं, हिंदुत्वाचा पण त्यांना शहाजान प्रमाणे एकांतवासात ठेवलं, हे सुद्धा या हिंदुत्ववादी यांना चालत आहे. कोणी असं उठून सांगत आहे.का कुठे आहेत आमचे शहाजान? म्हणजे कुठे आहेत आमचे अडवाणी? काय झाले त्यांचे? त्यांना असं बंदिस्त का ठेवल आहे? कोंडून का ठेवले? हे ढोंगी लोक आहेत.असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केला.**

ते म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट यांनी काय केले कबर खोदा सांगितले नाही. औरंगजेबाची त्यांनी एका झटक्यात औरंगजेबाच्या नावाने जे शहर गाव होते त्याचे नाव बदलून टाकले. औरंगजेबाचा नामोनिशान खतम करून टाकला. हे आजपासून संभाजीनगर आहे, असे म्हटले होते. त्यासाठी एखादा अध्यादेश काढावा असे काही नाही. शिवसेनाप्रमुखांनी ९० सालात जाहीर करून टाकले औरंगाबाद नसून हे संभाजीनगर. त्याला म्हणतात हिंदुहृदयसम्राट हिंदुत्व. कौतुक कसं काय म्हणता? आम्ही जेव्हा असे म्हणालो त्या दिवशी तेव्हा देवेंद्र फडणवीस म्हणाले संजय राऊत यांच्यावरती उपचार केले पाहिजे. त्यांना स्वतः विषयी चांगले सत्यही पाचवायची ताकद राहिलेली नाही. आदित्य ठाकरे म्हणतात हे देवेंद्र फडणवीस यांना अडकवण्याचे षडयंत्र आहे. इम्तियाज जलील म्हणतात ही दंगल जी आहे देवेंद्र फडणवीस यांना कोंडीत पकडण्यासाठी केली. मिही तेच म्हणालो, पण देवेंद्र फडणवीस यांना संताजी आणि धनाजी प्रामाणिक स्वप्नातही संजय राऊत दिसतात आणि ते असे म्हणाले. यांच्या वरती उपचार केले पाहिजे काय उपचार केले पाहिजे. तुमचे सरकार पूर्ण मनोरुग्न आहे असे मी म्हणतो, तुमच्या संपूर्ण मंत्रिमंडळाची चाचणी केली पाहिजे. या पद्धतीने तुमचे मंत्री बोलत आहेत आणि धांगडधिंगा घालत आहेत, भ्रष्टाचार करत आहेत. काय चालू आहे विधानसभेत? विधान परिषदेत? संपूर्ण भारतीय जनता पक्षाचे मंत्रिमंडळ आहे. त्यांच्यावरती सरकारी खर्चाने उपचार करून घ्या, नितीन गडकरी यांनी जे सांगितलं आहे. त्यात तथ्य आहे. जनतेला धर्मांध आणि जातीवादी बनवण्याचा एक लॅबोरेटरी भारतीय जनता पक्षाने उघडला आहे. अजिबात जनता या राज्याची जातिवाद जातीवादी नाही. पण पुढारी आणि भारतीय जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी या देशात काही काळापासून धर्मांध आणि जातीवादी याचा विष पेरण्याचं सुरुवात केली. सुशांत सिंग राजपूत या दोन्ही आत्महत्या आहेत हे वारंवार सिद्ध झालं, स्पष्ट झाल आहे. पण राजकीय बदनामी कट आपल्या विरोधकांचा करण्यासाठी विशेषतः ठाकरे कुटुंबीयांचा या दोन्ही आत्महत्यांना कधी हत्या आहे कधी अमुक तर, कधी त्या पद्धतीचा रंग देण्यात आला. पाच वर्षानंतर दिशा सालियान यांच्या वडिलांना पुढे करण्यात आले आणि याचा तपास पुन्हा करावा, यासाठी याचिका झाली. सुशांत सिंग राजपूत प्रकरणात तर अख्या देशात आणि पार्लमेंट पर्यंत राजकारण. जसा औरंगजेबाचा राजकारण चालू आहे त्याचा मृतांचे राजकारण चालू आहे, मृतांना देखील भारतीय जनता पक्षाचे लोक सोडत नाही.विशेषतः चांगल्या घरातील व्यक्ती मरण पावतो त्याचे राजकारण करतात आणि त्यांच्या बदनामी मध्ये चांगल्या घरातल्या लोकांना त्याच्यावर चिखल फेकून बदनाम करायचं हे राजकारण भारतीय जनता पक्षाने सुरू केले आहे. सगळ्यांना त्रास झाला आहे. पण भारतीय जनता पक्षाचा हेतू काही सफल होत नाही. आमच्यासारखे लोक, ठाकरे परिवार सारखे लोक, अनिल परब यांच्यासारखे लोक खंबीरपणे लढत उभे आहेत. नारायण राणे कॉल या विषयावर उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा झाली. असे काही घडवायचे याचा पूर्णपणे इन्कार केला असा कोणताही फोन यासंदर्भात नारायण राणे यांना झाला नाही आणि हे संभाषण झाले नाही. मिलिंद नार्वेकर यांच्याशी देखील माझं बोलणं झालं नाही. मीही यासंदर्भात कोणाला फोन लावून दिला नाही. आता जे प्रमुख या संदर्भातले व्यक्ती आहेत. नारायण राणे यांचा उल्लेख करत आहेत. त्यांनी सांगितले आहे अशा प्रकारचे कोणतेही संभाषण झालेले मला दिसत नाही आणि झालेच नाही. नारायण राणे कशाच्या आधारावर असे प्रकारचे वक्तव्य करत आहेत. हे समजून घेणे गरजेचे आहे. त्यांची प्रकृती बरी नाही आहे का ७० री पार केली आहे आणि आम्हाला त्यांची प्रकृती ती चिंता वाटते. उद्धव ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांनी स्पष्ट शब्द सांगितले आहे, अशा प्रकारचे कोणतेही संभाषण फोनवर झालेले नाही. नारायण राणे यांना जेव्हा अटक केली मुख्यमंत्री यांच्या वरती भाष्य केले तेव्हा त्यांच्या कुटुंबातून उद्धव ठाकरेंना फोन आले होते. सांभाळून घ्या, त्यांची प्रकृती बरी नाही, त्यांना काही विकार आणि त्रास आहेत. त्यानंतर संध्याकाळी उद्धव ठाकरेंनी पोलिसांना सूचना देऊन त्यांना सुटका करायला लावली. केंद्रातून देखील फोन आले. अमित शाह यांचा उद्धव ठाकरे यांना फोन आला होता. ते आमचे केंद्रीय मंत्री आहेत, त्यांच्या कुटुंबीयांचे फोन होते, आता या गोष्टी काढायच्या असतात का? आता तुम्ही काढले त्यामुळे आम्हाला सांगावं लागलं. हायकोर्ट जर्जवरती आम्ही दोन दिवसांपासून बोलत आहोत. चीफ जस्टिस ऑफ इंडिया ३ मेंबर कमिटीच्या गटन केले आणि एक व्हिडिओ देखील अपलोड केला आहे. तुम्ही बघितला असेल जस्टीस वर्मा यांच्या घरी जी कॅश भेटली आहे आणि कॅशला आग लागून जाळली आहे. तो एक व्हिडिओ दिल्ली पोलीस कमिशनर यांनी देखील अपलोड केला आहे आणि चीफ जस्टीस यांनी देखील अपलोड केला आहे. हे कोणाच्या कार्यकाळामध्ये होत आहे, ना खाणार आणि ना दुसऱ्याला खायला देणार. नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात याप्रकारे एक जज घरी १५-२० करोड मिळत आहेत. असं वाटत आहे की हे एका दिवसाची कमाई आहे. मात्र, हे एका दिवसाची कमाईचा आहे. हायकोर्ट अशी लोकं दिल्लीमध्ये बोलत आहेत. मी दिल्लीमध्ये होतो. जो आकडा आला आहे पंधरा करोडचा १५ करोड काही नाही दिल्लीसाठी. हे फार गंभीर गोष्ट आहे.असे मत यावेळी खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले.



# सुशांत सिंग रजपूतने आत्महत्या केल्याचा सीबीआयचा रिपोर्ट

## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे पत्रकार परिषद स्पष्टीकरण

दैनिक आपला विदर्भ




**नागपूर/प्रतिनिधी :** राज्याचा गृहमंत्री असतांना सुशांत सिंग रजपूत यांनी आत्महत्या केली.त्यावेळी बांद्रा पोलिसांनी चौकशी केली. मुंबई पोलिसांनी आत्महत्या केल्याचा रिपोर्ट दिला. पण बिहार निवडणुकीवर त्यावेळी राजकारण केले. सुशांतच्या वडिलांना तिथे केस टाकायला लावली. यात मुंबई बांद्रा पोलिसांनी चौकशी केली होती. चार वर्षाने सीबीआयने रिपोर्टर दिला, आत्महत्या केल्याचं सांगितले आहे. असे स्पष्टीकरण माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची पत्रकार परिषदेत दिले.

यावेळी ते म्हणाले की, हेच भाजपचे लोक कोरटकर सारखा चिल्लर माणूस पोलिसांना सापडत नाही, कोणाचे संरक्षण आहे? तो सुरक्षित आहे. तो भारतात आहे की,परदेशात गेला हे कोणी सांगत नाही आहे. अनके लोकांचे संबंध असलेले लोक सत्तेत आहेत. खोक्या भोसले पोलिसांना सापडत नव्हता, मिडीयावाले शोधत होते.नारायण राणे वक्तव्य दिशा सालियान प्रकरण बदनाम करण्याचे काम करत आहे. यात निर्णयात शुक्ल कांद्यावर कमी केले तसेच संत्रा, मोसंबी बंगलादेशला जाते. त्यावरही निर्णयात कर कमी केल्यास याचा फायदा होईल. जयकुमार गोरे काय बोलले मला माहीत नाही. त्या महिलेजवळ असं काय होते की, ज्यामुळे एक कोटी आमिष देऊन अटक केले? तीच तोंड बंद करण्यात आले आहे. हिंसाचार नागपूर प्रकरणी दोषींवर कारवाई व्हावी, पण दोषी नसले त्यावर कारवाई होऊ नये, असे मत यावेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

# सरकारने काद्या उत्पादकांबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे: मंत्री गिरीष महाजन यांची माहिती





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** सरकारने महत्वाचा निर्णय घेतला आहे, कांदा उत्पादकांना याबाबत फायदा होईल,अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, आज त्र्यंबकेश्र्वरला मुख्यमंत्री जाणार आहेत. दर्शन घेऊन ते कुंभमेळा बाबत माहिती घेणार आहेत. कुंभमेळा नियोजनासाठी यावेळी मोठा चॅलेंज असणार आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्र्वरला प्रत्यक्ष जाऊन मुख्यमंत्री पाहणी करून माहिती घेणार आहेत. सुशांत सिंह राजपूत आत्महत्या प्रकरण चौकशी नंतर स्पष्ट होईल. नियमाप्रमाणे सगळे बाहेर येईल. कांद्याबाबत केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. कांदा उत्पादकांना याबाबत फायदा होईल. आदित्य ठाकरे आरोपाबाबत चौकशी सुरू आहे, चौकशीनंतर सगळे बाहेर येईल, सखोल चौकशी सुरू आहे. कुंभ निमंत्रण मंत्र्यांना आज बोलवले आहे. आजच्या बैठीकीचे आमंत्रण आहे. पुढच्या आठवड्यात परत बैठक होणार आहे. साधू महंत यांच्यासोबत देखील चर्चा झाली आहे. नारायण राणे सांगत असतील तर, त्यात तथ्य असेल.असे मत मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केले.

# परमेश्वराला जेवढं मानतो तेवढेचं शिवरायांना आम्ही मानतो : गुलाबराव पाटील यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ




**नाशिक/प्रतिनिधी :** या घटना घडत आहेत त्यासाठी समाजात प्रबोधन करण्याची गरज आहे.- ज्या या घटना घडत असतात. त्यावेळी लोकांचा सरकारकडे रोष असतो. या घटना थांबण्यासाठी समाजाने देखील प्रयत्न करणे गरजेचे. मी जेव्हडे परमेश्र्वराला मानतो तेव्हढेच छत्रपती शिवरायांना मानतो, छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे तुमचे सर्वांचे दैवत आहे.असे मत मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी गुलाबराव पाटील म्हणाले की, कायदा सुव्यवस्था ही गोष्ट कुणी बोलत असेल तर ते खोटे आहे. जळगाव येथील घटना ही गायीच्या भांडणातून घडलेली आहे.आपण कलम वाचल तर, निश्र्चितपणे त्या मुलीला ज्या गाडीतून नेले ती म्बुलन्स शिवसेनची आहे. म्हणून आम्हाला ती घटना समजली. पूर्ण घटनेची, कलम कोणते लागले ती माहिती तसेच पोलिसांनी दिलेले स्टेंटमेंट नपाहता कुणाच्याही मुलीच्या असे आरोप करणे, जिल्ह्याची सर्व वाट लागली आहे.असे म्हणणं उचित नाही. ही घटना घडली तेव्हा मी अर्ध्या तासात मी तिथे पोहचलो होतो. ही घटना माझ्या मतदार संघातील आहे. जळगाव जिल्ह्याला बदनाम करण्याचे काम विरोधी पक्षाच्या आमदार करीत आहेत. मलाही मुलगी आहे. आरोप करतांना कोणतीही मुलगी बदनाम होईल असे आरोप करू नये,आरोप करताना सांभाळून करावेत अशी माझी त्यांना विनंती आहे.

छत्रपती शिवाजी महाराज व कबरीचा वाद आम्ही उकरून काढला नाही. औरंगजेब कसा संत होता असे काही लोकांनी विधानसभेत भाषण केले.त्या आमदारांना समज दिलीच पाहिजे, परमेश्र्वराला जेवढे आम्ही मानतो तेवढेच शिवरायांना आम्ही मानतो.औरंगजेब हा क्रूर होता त्याने बापाला जेलमध्ये टाकले, छत्रपती संभाजी महाराजांचा छळ केला. धर्म न सोडणाऱ्या संभाजी महाराजांची बरोबरी औरंगजेबाची करत असेल तर, आम्ही काय ऐकतच राहायचे का असा प्रश्न यावेळी त्यांनी केला. नाशिक पालकमंत्री पद हा माझा विषय नाही. तो तिघा नेत्यांचा विषय आहे. मला पालकमंत्री केले त्याबद्दल मी तिघांचा आभारी आहे. असे प्रतिक्रिया मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# समाजाच्या शेवटच्या घटकासाठी कार्य हीच अर्थपूर्ण जीवनाची दिशा ! : न्या. अनिल किलोर



दैनिक आपला विदर्भ

- विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा उत्साहात संपन्न
- प्रादिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना लाभाचे वितरण








**बुलढाणा/प्रतिनिधी : 'समाजाला काही देणं लागतं' या दृष्टीकोनातून शेवटच्या घटकाला नजरेत ठेवून त्यांच्या फायद्यासाठी नेहमी प्रयत्न करत राहावा. यातूनच जगण्याला अर्थ मिळेल आणि आयुष्य जगण्याची दिशा, ध्येय प्राप्त होईल, असे प्रतिपादन नागपूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी केले.**

शहरातील सहकार विद्या मंदिर येथे आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याच्या उद्घाटनाप्रसंगी न्यायमूर्ती अनिल किलोर बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष मंजुषा देशपांडे, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे, विधिज्ञ, विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते.

न्यायमूर्ती अनिल किलोर पुढे म्हणाले की, अनेक लोकांना कायद्याची पुरेपूर माहिती नसल्यामुळे त्यांना त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव होत नाही. संविधानाने दिलेले अधिकार माहिती नसल्यामुळे अनेकजण न्यायालयापर्यंत जात नाहीत. अशावेळेला लोकांना कायद्याचे ज्ञान असणे गरजेचे आहे. काही चुकीचे होत असेल तर त्या संबंधात न्यायालयात दाद मागायला पाहिजेत. समाजात वावरतांना लोकांना आपले अधिकार माहित व्हावेत यादृष्टीने उच्च न्यायालयाच्या नागपूर बार असोसिएशनचा अध्यक्ष असतांना 'न्याय दूत' हा उपक्रम राबवला. या उपक्रमाच्या माध्यमातून गावांना भेटी देवून लोकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला, असेही न्यायमूर्ती अनिल किलोर यांनी आवर्जून सांगितले.

शासकीय योजनांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा. आजच्या स्मार्टफोन सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकांना शासकीय योजनांचा फायदा कसा करुन घेता येईल यासाठी प्रयत्न करावे. यातूनच शासनाच्या कार्यक्रमांना अर्थ प्राप्त होईल. शासकीय योजनांच्या महामेळाव्यासारख्या कार्यक्रमातून लोकांना फायदा व्हायला पाहिजेत आणि जास्तीत जास्त असे उपक्रम राबवले पाहिजेत, अशी अपेक्षाही न्यायमूर्ती श्री किलोर यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचेसह मान्यवरांनी मनोगत व्यक्त करुन मार्गदर्शन केले.

**सहज प्रणाली ॲपचे लोकार्पण**

महसूल विभागाने डिजिटाईज्ड केलेले दस्तावेज नागरिकांना सहजरित्या प्राप्त व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने 'सहज प्रणाली'प विकसित केले आहे. या पले आज न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या ॲपचा लोकांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**५० हून अधिक विभागांचे माहिती स्टॉल्स**

विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात विविध विभागांच्या योजनांची माहिती लोकांना होण्यासाठी विविध विभागाचे ५० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्सना लोकांनी भेटी देवून योजनांची माहिती जाणून घेतली.

यावेळी न्यायमूर्ती श्री. किलोर यांच्या हस्ते विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले.

## विविध वृत्त...

### दिशा सालियन प्रकरणाची चौकशी होऊ द्या : खासदार प्रफुल पटेल



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** दिशा सालियन प्रकरणामध्ये त्यांच्या वडिलांनी जी याचिका टाकली आहे. त्याच्यावरून त्याची चौकशी होऊ द्या आणि सत्य समोर येऊ द्या, असे मत खासदार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी राज्यसभा सदस्य अपात्रता तक्रार हे प्रकरण तसं नसून मी जुन्या कार्यकाळाचा राजीनामा दिला असून, माझा नवीन कार्यकाळ सुरू झालेला आहे. तसेच वंदना चव्हाण यांची टर्म संपली आहे. त्याच्यामुळे आम्ही जो केलेला अपात्रतेबद्दलचा अर्ज आहे, तो आपोआप मागे झालेला आहे.अशी माहितीही खासदार प्रफुल पटेल यांनी दिली.तसेच पटेल म्हणाले की, सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरणाचा तपास सीबीआय सारख्या नामवंत संस्थांनी केला आहे. जर अशी क्लोजर रिपोर्ट सादर केली असेल ते आपण सर्वांना मान्यच करावे लागेल. नागपूरमध्ये जी दंगल घडली ती अत्यंत दुर्दैवी असून, अशी घटना व्हायला नको पाहिजे होती. आता सगळं शांत झाले आहे. मात्र, कॉंग्रेसने जे सत्यशोधक समिती स्थापन केली आहे. ते काय सत्य शोधणार आहेत. त्यांनाच माहीत असा टोला त्यांनी लगावला आहे. दिशा सालियन प्रकरणाबाबत नारायण राणे यांना याबद्दल अधिक माहिती असेल मी त्याच्यावर बोलू शकत नाही. मात्र, दिशा सालियन प्रकरणामध्ये त्यांच्या वडिलांनी जी याचिका टाकली आहे. त्याच्यावरून त्याची चौकशी होऊ द्या आणि सत्य समोर येऊ द्या, असे मत खासदार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केले.

### ऑटोमध्ये ऑक्सिजन सिलेंडर टाकत असताना स्फोट, बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरातील घटना





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरात लक्ष्मीनगर येथे आज रविवारी दुपारी ऑटोमध्ये ऑक्सीजन सिलेंडर टाकत असताना अचानक स्फोट झाला. या स्फोटात एक जण ठार झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ऑटोमध्ये सिलेंडर ठेवत असताना गॅस गळतीमुळे किंवा अन्य तांत्रिक कारणामुळे हा स्फोट झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमींना मदत केली. त्यानंतर जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### विशेष जन सुरक्षा अधिनियम २०२४ कायदा रद्द करण्यासाठी विविध संघटनांचे आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** राज्य सरकारने प्रस्तावित विशेष जनसुरक्षा अधिनियम २०२४ कायदा रद्द करण्याची मागणी, विविध संघटनांनी करून आंदोलन केले आहे. विशेष जनसुरक्षा अधिनियम २०२४ हा नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याविरोधी असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. शहीद भगतसिंग यांच्या स्मृतिदिनी विविध संघटनांचे निदर्शने आंदोलन केले. निदर्शने करून कायद्याला विरोध दर्शविला आहे. आंदोलनात विविध संघटनांचा सहभाग घेतला असून स्वाक्षरी मोहीम राबवणार आहे. अशी माहिती वर्धा येथील किसान अधिकार अभियानाचे मुख्य प्रेरक अविनाश काकडे यांनी दिली आहे.



## बुलडाणा जिल्हयाला ३ शववाहीका मंजूर

### ग्रामीण भागात अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नेण्याच्या दृष्टीने होणार शव वाहीकेची मदत

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला होता पाठपुरावा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर मृतदेह हा अंतीमसंस्कारासाठी त्याच्या घरापर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून बुलढाणा जिल्ह्याला ३ शववाहिका मिळल्या आहे . या संदर्भात केंद्रीय आयुष , आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता

व्यक्ती आजारी पडला किंवा काही व्याधी निर्माण झाली तर त्याला सर्वसामान्यपणे जिल्हा सामान्य रुग्णालय येथे वैद्यकीय उपचार करिता दाखल केले जाते अनेक वेळा उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू होतो अशावेळी त्याचा मृतदेह त्यांच्या घरापर्यंत पोहचविण्यासाठी खाजगी वाहणाची मदत घ्यावी लागले .. करण रुग्णवाहीका ही आत्यवश्यक सेवासाठी वापल्या जात असल्याने ती मिळत नाही त्यामुळे शासकीय रुग्णालयात मृत्यु झालेल्या व्यक्तीला ग्रामीण भागात त्याच्या घरापर्यंत अंत्यविधीसाठी पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हास्तर आणि तालुकास्तरावर शववाहिका असावी या दृष्टिकोनातून केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता त्यानुसार राज्यामध्ये १३२ शववाहीका मंजूर करण्यात आल्या आहेत त्यातील ३ शववाहीका बुलढाणा जिल्ह्याला मिळणार आहे जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली घ्या शव वाहीका राहणार आहे त्यातील एक शव वाहीका बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय येथे राहणार आहे त्या शव वाहिकेचा उपयोग ग्रामीण भागातील जनतेला होणार आहे.

### २१ दिवसाच्या बाळाला ६२ चटके दिल्याच्या घटनेची पथनाट्यातून अनोखी जनजागृती



दैनिक आपला विदर्भ



**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीच्या मेळघाटात २१ दिवसाच्या बाळाला चक्क ६२ वेळा डागण्या (विळ्याने चटके) दिल्याची धक्कादायक घटना मेळघाटात घडली होती. या घटनेचे वास्तवदर्शी चित्रण उभे करणारे पथनाट्य जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून मेळघाट रंगोत्सवात सादर करण्यात आले. दरम्यान, २१ दिवसाच्या बाळाला कसे ६२ चटके देण्यात आले हे उलगडण्यात आले. त्याचवेळी पथनाट्यातून अनिष्ट प्रथांवर प्रहार करत आदिवासींनी विज्ञानाची कास धरावी असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी प्रियमवंदा म्हाडदळकर यांनी केले आहे.

## अधिकारी पोस्ट टाकत स्वत:ला ग्लोरिफाय करतात, धोरण गरजेचे

### आमदार परिणय फुके यांची पत्रकार परिषदेत व्यक्त केले मत

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** अधिकारी पोस्ट टाकत स्वतःला ग्लोरिफाय करतात, यामुळे पोलीस असो की जिल्हाधिकारी आम्हीच सर्व्हेसर्वा आहोत, असे दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे यासाठी धोरण यावे यासाठी प्रयत्न झाले पाहिजे, असे मत आमदार परिणय फुके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की,न्यायालयाचे संरक्षण काढून अटक केली जाणार आहे. कोणताही पोलीस अधिकारी सरकार विरोधात जाऊन मदत करणार असे होऊ शकत नाही, नक्कीच पुढील तीन ते चार दिवसांत बेड्या दिसतील असा दावा केला, हे फडणवीस यांचे राज्य आहे. दिवसभर टीव्हीवर राहण्यासाठी संजय राऊत बेछूट आरोप करत असतात. अजित पवार असे काही बोलले असतील असे वाटत नाही. लाडकी बहिणीला २१०० रुपये दिले नाही, ३६ हजार कोटी लाडकी बहिणीसाठी दिले आहे. ही योजना सुरू राहणार आहे. यासाठी दिले, २१०० काय ३००० हजार पण देऊ पण थोडा वेळ थांबावे, फक्त राज्याची परिस्थिती सुधारू द्या, गडकरी हे स्पष्ट वक्ते आहेत. यात काही अनुभव असेल त्यावर ते बोलले असते, आम्ही जातीयवादी नाही, काही नेते असतील तर ते बोलले असतील. बेटिंग अँप सोबत बेटिंग अँप ची जाहिरात करणारे सुद्धा दोषी आहे, अभिनेते आहेत. लोकांचा विश्र्वास बसून लोकांना लत लागते. या संदर्भात निर्बंध आहेत. कायदे पाहिजे, रोखण्यासाठी कायदा आला पाहिजे, कडक कारवाई या माध्यमातून झाली पाहिजे.असे मत यावेळी आमदार परिणय फुके यांनी व्यक्त केले.

## जलतारा योजना ही लोक चळवळ व्हावी : तहसीलदार तेजनकर

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** सध्या राज्यभर राबविण्यात येत असलेली जलतारा ही योजना लोक चळवळ व्हावी असे प्रतिपादन येथील तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी आयोजित शांतता कमिटीच्या सभेमध्ये केले यावेळी त्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या ठाणेदार रामेश्र्वर चव्हाण, वीज वितरण कंपनीचे अभियंता अतिष जाधव, नगरपरिषदेचे शिवानंद बरडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

काल दिनांक २२ मार्च रोजी येणारी ईद , सण आणि उत्सव शांततेत बंधू भावाने साजरे व्हावे याकरिता येथील पोलीस स्टेशनमध्ये शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले या शांतता समितीच्या सभेला पोलीस पाटील सरपंच प्रतिष्ठित नागरिक नगरसेवक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते सध्या तापमानात प्रचंड वाढ होत असल्यामुळे तसेच येणाऱ्या काळात पाणी समस्या निर्माण होणार असल्यामुळे तसेच आज २२ मार्च रोजी जागतिक जलदिनाचे औचित्य साधून त्यांनी पाण्याचे महत्त्व विशद केले यावेळी त्यांनी जलतरा या योजनेबद्दल माहिती दिली यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीवरच सर्व अर्थ चक्र अवलंबून आहे शेतकऱ्यांना कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षणाचा सामना करावा लागतो याकरिता जलतारा ही योजना प्रभावी ठरत आहे पाऊस जास्त झाला तर पाणी वाहून न जाता जलतारा या खड्ड्यामध्ये साठविल्या जाते परिणामी पाणी पातळीत वाढ होते याचे ज्वलंत उदाहरण जालना जिल्हा असून या जिल्ह्यामध्ये ही योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यात आली आहे जानेवारी महिन्यात कोरड्या पडणाऱ्या विहिरी वरून बारमाही सिंचन होत आहे आता ही योजना महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे अल्पभूधारक अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व महिला शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे त्याकरिता शासकीय अनुदानही देण्यात येत आहे शेतकऱ्यांनी आपल्या गावातील कृषी सहाय्यकाशी संपर्क साधून या योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.